महाराष्ट्र राज्यातील प्रमुख ए.पी.एम.सी मार्केट मध्ये आवक होणाऱ्या रब्बी कांद्याचे बाजार व्यवस्थापन

भाकृअनुप - राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

बारामती, पुणे, महाराष्ट्र ४१३११५

महाराष्ट्र राज्यातील प्रमुख ए.पी.एम.सी मार्केट मध्ये आवक होणाऱ्या रब्बी कांद्याचे बाजार व्यवस्थापन

अंकुश एल. कांबळे

धनंजय डी. नांगरे

नवीन पी. सिंह

भास्कर गायकवाड

हिमांशु पाठक

भाकृअनुप–राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

ICAR–National Institute of Abiotic Stress Management

बारामती, पुणे, महाराष्ट्र 413 115

Baramati, Pune, Maharashtra 413 115

उद्धरण:

अंकुश एल. कांबळे, धनंजय डी. नांगरे, नवीन पी. सिंह, भास्कर गायकवाड, हिमांशु पाठक. तांत्रिक रिपोर्ट क्रमांक:३६. भाकृअनुप - राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान, बारामती, पुणे, महाराष्ट्र, भारत.

तांत्रिक रिपोर्ट क्रमांक: ३६

प्रकाशक

डॉ. हिमांशु पाठक, निदेशक

भाकृअनुप - राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

माळेगाव, बारामती – ४१३ ११५, पुणे, महाराष्ट्र, भारत

दूरध्वनी : ०२११२–२५४०५७, फॅक्स : ०२११२-२५४०५६

वेबसाइट: www.niam.res.in

अनुक्रमणिका

अ. क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
१.	प्रस्तावना	०१
२.	महाराष्ट्रातील कांदा पिकाचे वेगवेगळे हंगाम	०१
३.	रब्बी कांद्याचा पुरवठा	०२
४.	घरेलू बाजारामद्धे कांदयाची मागणी	०२
५.	कांद्याची किंमत कशी ठरते: मागणी आणि पुरवठा सिद्धांत	०३
६.	भारतातील कांद्याच्या किमतीतील चढ-उताराचे प्रकार	०३
७.	रब्बी कांद्याचा बाजारभावावर कसा परिणाम होतो	०४
८.	कांद्याच्या किंमतीतील चढउताराचा काय परिणाम होतो	०५
९.	महाराष्ट्रातील प्रमुख ए.पी.एम.सी कांदा मार्केट मधील कांद्याची आवक	०५
१०.	महाराष्ट्रातील प्रमुख ए.पी.एम.सी कांदा मार्केटमधील बाजार भावाची स्थिति	०६
	- पुणे मार्केट मधील बाजार भावाची स्थिति	०६
	- सोलापूर मार्केट मधील बाजार भावाची स्थिति	०६
	- मुंबई मार्केट मधील बाजार भावाची स्थिति	०७
	- कोल्हापूर मार्केट मधील बाजार भावाची स्थिति	०८
	- नागपूर मार्केट मधील बाजार भावाची स्थिति	०८
	- नाशिक जिल्ह्यातील ए.पी.एम.सी. मार्केट मधील बाजार भावाची स्थिति	०९
११.	फेब्रुवारी - मार्च दरम्यान किमती का कमी असतात? थोडक्यात	१२
१२.	रब्बी कांदा उत्पादकांनी वाजवी दर मिळण्यासाठी घ्यावयाची काळजी	१२

प्रस्तावना

कांदा हे जगातील महत्वपूर्ण पीक असून बऱ्याच देशांमधे याची व्यावसायिकपणे शेती केली जाते. भारतामधे कांदा पिकाला व्यापारीदृष्टया अनन्य साधारण महत्व आहे. देश्यातील जवळपास प्रत्येक स्वयंपाकघरात ही एक महत्त्वाची वस्तू मानली जाते. याचा वापर भाजीची चव वाढविण्यासाठी तसेच कोशिंबीर, चटणी, मसाला, केचप, सॉस, इ. साठी केला जातो. त्याचबरोबर कांदा हा विविध औषधी गुनांनी युक्त आहे. कांदा उत्पादनात महाराष्ट्र देश्यामधे अग्रेसर आहे. देशाचे २८.३३ टक्के कांदा उत्पादन एकट्या महाराष्ट्रात होते. महाराष्ट्रात नाशिक, पुणे, सातारा, जळगाव, सोलापूर आणि अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने कांद्याची लागवड होते. महाराष्ट्रात कांद्याच्या लागवडीखालील सुमारे ९४.६८ टक्के क्षेत्र या सहा जिल्ह्यात आहे.

देशाच्या एकूण कांदा उत्पादनापैकी ५०-६० टक्के उत्पादन एकटया रब्बी हंगामात होते. नैसर्गिकरित्या या हंगामाची उत्पादकता तसेच कांद्याची साठवण क्षमता उत्कृष्ट असते. रब्बी कांदयाच्या बियांची ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत पेरणी करून ड़िसेंबर-जानेवारी मधे रोपांची पुनर्लागवड केली जाते. याची काढणी मुख्यता एप्रिल-मे मधे केली जाते. काढणी झाल्याबरोबर मोठ्या प्रमाणात हा कांदा एप्रिल-मे मधे घरेलू बाजारपेठेमधे आणला जातो. या कालावधीत अतिशय जास्त प्रमाणात होणारी कांद्याची आवक यामुळे बाजारभाव अस्थिर होऊन जातात व त्यामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात दराची घसरण होते.

दुसरया बाजूने विचार करायचा झाला तर काहीप्रमाणत या रब्बी कांदयाची साठवण केली जाते व साठवलेला कांदा ऑगस्ट ते डिसेंबर या कालावधीत मार्केट मधे आणला जातो. याव्यतिरिक्त ऑगस्ट ते डिसेंबर या काळात अर्ली-खरीफ व खरीफ कांद्याची काढणी होउन बाजारात येतो. ऑगस्ट ते डिसेंबर मधे फक्त खरीफ (अर्ली-खरीफ + खरीफ) हंगामातील उत्पादन घरेलू बाजारात असलेली कांदयाची मागणी पूर्ण करू शकत नाही, कारण खरीफ हंगामातील एकूण उत्पादन फारच कमी म्हणजे फक्त १० टक्केच्या आसपास असते. म्हणून रब्बी हंगामातील साठविलेला कांदा ऑगस्ट ते डिसेंबर या कालावधीत मार्केट मधे असलेली तूट भरून काढण्याचे काम करत आसतो. रब्बी हंगामातील साठवलेल्या कांद्याचे प्रमाण तसेच खरीफ हंगामातील कांद्याचे उत्पादन मिळून ऑगस्ट ते डिसेंबर या कालावधीतील किमती ठरतात. अगदी थोडयाप्रमाणात जरी रब्बी हंगामातील साठवलेला कांदा किंवा खरीफ हंगामातील कांदा उत्पादन यांच्यामधील संतुलन बिघडले की मोठ्या प्रमाणात ऑगस्ट ते डिसेंबर या कालावधीत कांदयाच्या किंमती अस्थिर होउण जातात. अश्या परिस्थित रब्बी कांद्याचे बाजार व्यवस्थापन कसे करावे याविषयी सविस्तर माहिती या लेखात दिलेली आहे.

महाराष्ट्रातील कांदा पिकाचे वेगवेगळे हंगाम

महाराष्ट्रात कांदा अर्ली-खरीफ, खरीफ, लेट-खरीफ आणि रब्बी या चार हंगामात घेतला जातो. अर्ली-खरीफ कांद्याची काढणी ऑगस्ट-सप्टेंबर दरम्यान केली जाते ज्याची लागवड एप्रिल-मे मध्ये करण्यात येते. राज्यात खरीफ कांद्याची रोपण जुलै-ऑगस्ट दरम्यान होते व काढणी ऑक्टोबर-डिसेंबर दरम्यान केली जाते. लेट-खरीफ कांद्याची काढणी जानेवारी ते मार्च दरम्यान होते ज्याची लागवड ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान केली जाते. राज्यातले शेतकरी डिसेंबरमध्ये रब्बी कांद्याची लागवड सुरू करतात व ती जानेवारी अखेर पर्यंत चालते. लावलेल्या रब्बी कांद्याची काढणी मार्चच्या अखेरीस सुरू होते आणि मे अखेरपर्यंत चालू राहते. महाराष्ट्रातील कांद्याची पेरणी, पुनर्लावणी व काढणीची वेळेचा तपशील तक्ता-1 मध्ये दिली आहे. राज्यात रब्बी हंगामात एकूण कांद्याच्या सुमारे 50-60 टक्के उत्पादन होते, त्यानंतर लेट-खरीफ कांद्याचे 30-40 टक्के, खरीफ कांद्याचे 8-9 टक्के व अर्ली-खरीफ कांद्याचे 1-2 टक्के उत्पादन होते.

तक्ता 1. महाराष्ट्रातील कांद्याची पेरणी, पुनर्लावणी आणि काढणीची वेळ

हंगाम	पेरणीची वेळ	पुनर्लावणीची वेळ	काढणीची वेळ
अर्ली-खरीफ	फेब्रुवारी-मार्च	एप्रिल-मे	ऑगस्ट-सप्टेंबर
खरीफ	मे-जून	जुलै-ऑगस्ट	ऑक्टोबर-डिसेंबर
लेट-खरीफ	ऑगस्ट-सप्टेंबर	ऑक्टोबर-नोव्हेंबर	जानेवारी-मार्च
रब्बी	ऑक्टोबर-नोव्हेंबर	डिसेंबर-जानेवारी	एप्रिल-मे

रब्बी कांद्याचा पुरवठा

मान्सूनच्या पावसानंतर ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान रब्बी कांद्याचे बी पेरले जातात व डिसेंबर-जानेवारीमध्ये त्याची रोपण केली जाते. या रब्बी कांद्याची एप्रिल-मे दरम्यान बहुतांश प्रमाणात काढणी केली जाते. म्हणून त्याला उन्हाळी कांदा असेही म्हणले जाते. रब्बी कांदा बहुतांश प्रमाणात बागायती पद्धतीने (सिंचित) घेतला जात असल्यामुळे त्याचा आकार व उत्पादन जास्त आसते. मान्सूनमध्ये चांगला पाऊस झाल्यास रब्बी हंगाम दरम्यान सिंचनासाठी भूजल पातळी चांगली राहते परिणामी उत्पादन चांगले मिळते. याउलट हिवाळ्याच्या हंगामात पाऊस / गारपीट झाल्यास रब्बी कांद्याची गुणवत्ता व उत्पादकता यावर विपरीत परिणाम होतो. अश्या रब्बी कांद्याची काढणी मार्चच्या शेवटी सुरू होते व मे अखेर पर्यंत चालू राहते. परिणामी, मोठ्या प्रमाणात उत्पादन होते व देशांतर्गत बाजार एप्रिल-जून दरम्यान रब्बी कांद्याने भरले जातात. दुसऱ्या भाषेत सांगायचे झाले तर एप्रिल-जून दरम्यान रब्बी कांद्याची खूप मोठ्या प्रमाणात बाजारांमद्धे आवक होते.

देशांतर्गत बाजारपेठांमध्ये एप्रिल ते जून दरम्यान कांद्याची प्रचंड आवक मोठ्या प्रमाणात कांद्याच्या किमतीमद्धे अस्थिरता निर्माण करते. एप्रिल ते जून दरम्यान बाजारपेठेत प्रचंड आवक झाल्यामुळे कांद्याच्या किंमतींमध्ये मोठी घसरण होते. दुसऱ्या बाजूने विचार केला तर हाच रब्बी कांदा देशांतर्गत ग्राहक बाजारात सुस्त काळात (slack period) गॅप फिलर म्हणून काम करतो. ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान अर्ली-खरीफ व खरीफ कांद्याची ताजी काढणी होते व तो कांदा बाजारात येतो, परंतु या दोन हंगामांचे उत्पादन मागणी पूर्ण करू शकत नाही, कारण या दोन हंगामांचे एकूण उत्पादन खूप कमी म्हणजे फक्त १०% आहे. अश्या परिस्थितीत ग्राहक बाजारात ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान येत असलेली कांद्याची कमतरता साठवलेला रब्बी कांदा भरून काढतो. म्हणून रब्बी कांद्याला एप्रिल-मे मध्ये कांद्याच्या किमतींमद्धे अस्थिरता तयार करणारा (ग्लट क्रिएटर) व ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान किमतींमद्धे स्थिरता (स्टॅबिलायझर) आणणारा असे म्हटले जाऊ शकते.

घरेलू बाजारामद्धे कांदयाची मागणी

कांदा हे भारतातील सर्वात महत्वाचे व्यावसायिक पीक असून त्याची देश्यामधे मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. त्याचा भारतीय आहारामधे व्यापक प्रमाणात उपभोग घेतला जातो. भारतीय खाद्यपदार्थामधील हा एक अविभाज्य घटक आहे. जेवणाची चव वाढविण्यासाठी कांदा जवळजवळ सर्व भारतीय पाककृती मधे मिसळला जातो. याचे लहान-लहान टुकड़े करून स्लाड म्हणून वापर केला जातो. पौष्टिकत्वे बरोबर कांद्यामध्ये औषधी गुणधर्म पण भरपूर आहेत. खाद्यपदार्थांमधील एक प्रमुख घटक असल्याने भारतीय दररोज कांद्याचा वापर आपल्या आहारामधे सातत्याने करतात. प्रत्येक घरामधे एक निश्चित प्रमाणात दररोज कांद्याचा वापर केला जातो. पाकगृहातील कांदा अविभाज्य घटक असल्याने याची मागणी वर्षभर स्थिर असते. परंतु पुरवठ्यामधे होणारया असंतुलनामूळे बाजार भावामधे मोठ्या प्रमाणात अस्थिरता निर्माण होत राहते.

कांद्याची किंमत कशी ठरते: मागणी आणि पुरवठा सिद्धांत

आर्थिक सिद्धांतामध्ये, मागणी व पुरवठा सिद्धांत हा अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवणारा मूलभूत तत्त्व मानला जातो. या सिद्धांताचे परिस्थितीनुसार वर्णन केले जाते जसे i) पुरवठा वाढला की किंमत कमी होते किंवा याउलट, ii) मागणी वाढली की किंमत वाढते किंवा या उलट होते. मुळात हे तत्व मागणी आणि पुरवठा आधारावर वस्तूंची किंमत ठरवते, ceteris paribus. जेव्हा मागणी आणि पुरवठा संतुलित असतो, तेव्हा अर्थव्यवस्थेत किंमत आणि प्रमाण यांच्यात समतोल असल्याचे दिसते. भारतीय बाजारपेठेमद्धे कांद्याच्या किमती मागणी आणि पुरवठा या सिद्धांतावरच ठरत असतात.

भारतातील कांद्याच्या किमतीतील चढ-उताराचे प्रकार

भारतीय बाजारात कांद्याच्या किंमतीतील चढउताराचे दोन प्रकार आढळतात. पहिले म्हणजे वर्षभरात वेगवेगळ्या हंगामात होत आसलेला किमतीमधील चढ़-उतार (Intra-Year Price Fluctuation) आणि दुसरे म्हणजे विभिन्न वर्षात किंमतीतील चढ-उतार (Inter-Year Price Fluctuation).

वर्षभरात वेगवेगळ्या हंगामात होत आसलेला किमतीमधील चढ़-उतार: याला किंमतीतील हंगामी चढ-उतार असेही म्हणतात. कांदा हे प्रामुख्याने रब्बी पीक आहे आणि त्याची जास्त प्रमाणात एप्रिल-मे दरम्यान बाजारात आवक होते, परंतु मागणी वर्षभर समप्रमाणात आसते. वरती चर्चा केल्याप्रमाणे, कांद्याची वर्षभर स्थिर मागणी आणि हंगामी अस्थिर उत्पादन यामुळे कांद्याचे दर वर्षभर स्थिर राहत नाहीत. उदाहरणार्थ पुणे एपीएमसी बाजारातील हंगामी किंमतींची वाटचाल आकृती-१ मध्ये दर्शविलेली आहे जी २०००-२०१५ च्या डेटा वरून निष्करक्षित केलेली आहे. आकृतीवरून असे दिसून येते की, पुणे एपीएमसी मार्केटमध्ये कांद्याचे दर फेब्रुवारी ते जुलै दरम्यान सरासरीपेक्षा कमी आणि उर्वरित काळात सरासरीपेक्षा जास्त नोंदवले गेले. एप्रिल मध्ये सर्वात कमी (सरासरी किंमतीच्या -41%) किंमतीची नोंद झालेली दिसते तर नोव्हेंबर मध्ये सर्वाधिक किंमत (सरासरी किंमतीच्या +53%) नोंदवली जाते. त्याचप्रमाणे, भारतातील जवळजवळ इतर सर्व कांदा बाजार पुण्याच्या बाजाराप्रमाणे किमती दर्शवितात आणि वर्षभरात किमतीतील हंगामी चढ-उतार दर्शवतात. यावरून असे लक्षात येते की कांद्याच्या किमती वर्षभरातील विभिन्न हंगामात वेगवेगळ्या असतात. यालाच आपण हंगामी चढ-उतार असे म्हणतो.



आकृती १: पुणे एपीएमसी बाजारातील हंगामी किंमतीची वाटचाल

आंतर-वर्षाच्या किमतींमधील चढ-उतार: भारतात आंतर-वर्षाच्या किंमतीतील चढ-उतार ही कांदा पिकामद्धे सामान्य वस्तु स्थिति आहे. भूतकाळातील कांद्याच्या किंमतीतील अस्थिरतामुळे वर्तमानमद्धे आंतर-वर्षाच्या किंमतीमध्ये चढ-उतार होत असतो. गत वर्षात कांद्याच्या किंमतीत झालेली मोठी वाढ शेतकऱ्यांना पुढील वर्षात उच्च किमतीच्या लोभापोटी अधिक कांदा पिकविण्यास आकर्षित करते. अश्या परिस्थितीत शेतकरी पुढील वर्षामध्ये जास्त किमती वाढतील या आशेने जास्तीत जास्त कांद्याची लागवड करतात. परिणामी पुढील वर्षात कांद्याची अधिक लागवड झाल्याने खूप मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. जास्त उत्पादन झाल्याने मार्केटमध्ये कांद्याची आवक जास्त होते व कांद्याच्या किमती मोठ्या प्रमाणात ढासळून जातात. परिणामी पुढील वर्षात शेतकरी कांद्याची कमी लागवड करतात. अश्या पद्धतीने वर्षानुवर्षे कांद्याच्या किंमतीतील अस्थिरतेचे दुष्ट चक्र सुरू असते. याव्यतिरिक्त, आंतर-वर्षाच्या किंमतीतील चढउतार मान्सूनची अनियमितता व इत्तर अजैविक घटकांमुळे पण होत आसते.

रब्बी कांद्याचा बाजारभावावर कसा परिणाम होतो

वरती चर्चा केल्याप्रमाणे, एकूण कांद्याच्या उत्पादनापैकी एकट्या रब्बी हंगामात सुमारे ५० ते ६० टक्के उत्पादन होते. आणि त्यामुळे घरेलू बाजारांमद्धे रब्बी कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक एप्रिल, मे आणि जूनमध्ये होते. राहिलेला कांदा शेतकरी साठवणीमद्धे ठेवतात व हळूहळू डिसेंबरपर्यंत बाजारात आणतात.
रब्बी कांदा बाजाराच्या किमतींवर वेगवेगळ्या पद्धतीने परिणाम करत असतो ते खाली सविस्तर वर्णन केले आहे.

अ) उन्हाळ्यात (एप्रिल-जून) किंमती कमी होणे

रब्बी कांद्याची मोठ्या प्रमाणात एप्रिल, मे आणि जून दरम्यान बाजारात आवक होते. परिणामी, उन्हाळ्यात (एप्रिल - जून) मागणीपेक्षा अधिक पुरवठा झाल्याने कांद्याच्या किंमती कमी होतात. या कालावधी मध्ये विशेषतः लहान आणि अल्पभूधारक शेतकरी ज्यांची धारण क्षमता कमी असते ते कांदा बाजारात विकण्यासाठी घेऊन येतात. त्यांच्या दैनंदिन खर्चाची पूर्तता करण्यासाठी उदा. बियाणे, खते, कीटकनाशके इत्यादी खरेदीसाठी घेतलेले कर्ज; शैक्षणिक खर्च, विवाह खर्च; पुढील पिकासाठी निविष्ठांची खरेदी इ. साठी ते त्यांचे उत्पादन लगेच विकून टाकतात. शिवाय या शेतकऱ्यांकडे कांद्याच्या साठवणुकीसाठी कांदा चाळीचा अभाव असतोच. म्हणून, जबरदस्तीने ते काढणी नंतर लगेचच त्यांचे उत्पादन बाजारांमद्धे घेऊन येतात ज्यामुळे बाजारपेठांमध्ये मोठी आवक होते, शेवटी पुरवठा मागणीपेक्षा जास्त होतो आणि एप्रिल-मे-जून मध्ये किंमती खूप कमी होतात.

आ) ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान किमार्तीमद्धे चढ-उतार

आपण वरती चर्चा केल्याप्रमाणे, रब्बी कांद्याचा मोठा भाग शेतकरी एप्रिल, मे आणि जूनमध्ये बाजारामद्धे आणतात व राहिलेला कांदा साठवणीमद्धे ठेवतात व हळूहळू डिसेंबरपर्यंत बाजारात घेऊन येतात. सामान्यत: मध्यम आणि मोठा शेतकऱ्याची धारण क्षमता जास्त असल्यामुळे ते कांदा साठवून ठेवतात व ऑगस्ट ते डिसेंबर या कालावधी मध्ये बाजारात आणतात. साठवलेला रब्बी कांदा ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान बाजारात येतो व तो कांद्याच्या किंमतींवर वेगवेगळ्या पद्धतीने परिणाम करतो, ते खाली सविस्तर पहा

i. रब्बी कांद्याची इष्टतम प्रमाणात साठवण त्याचबरोबर अर्ली-खरीफ आणि खरीफ कांद्याचे सामान्य उत्पादन

रब्बी कांद्याची इष्टतम प्रमाणात साठवण तसेच अर्ली-खरीफ आणि खरीफ कांद्याचे सामान्य उत्पादन यामुळे मागणी आणि पुरवठा यामध्ये बॅलन्स राहतो व कांद्याच्या किंमती ऑगस्ट-डिसेंबर दरम्यान स्थिर राहतात. कांद्याचे भाव या काळात सामान्य राहतात.

ii. रब्बी कांद्याची जास्त प्रमाणात साठवण तसेच अर्ली-खरीफ आणि खरीफ कांद्याचे सामान्य उत्पादन

रब्बी कांद्याची जास्त प्रमाणात साठवण तसेच अर्ली-खरीफ आणि खरीफ कांद्याचे सामान्य उत्पादन यामुळे ऑगस्ट-डिसेंबर दरम्यान मागणीपेक्षा पुरवठा जास्त होतो आणि कांद्याच्या किमती कमी होऊन जातात. जर रब्बी कांद्याचे उत्पादन जास्त असेल आणि निर्यात वातावरण प्रतिकूल असेल तर मध्यम आणि मोठा शेतकरी ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान मोठ्या किमतीच्या अपेक्षेने जास्त प्रमाणात कांदा साठवतो. या परिस्थितीत ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान मोठ्या प्रमाणात कांदा (साठवलेला रब्बी कांदा + अर्ली-खरीफ आणि खरीफ) बाजारात दाखल होतो. ही परिस्थिती बाजारपेठेत मागणीपेक्षा अधिक पुरवठा निर्माण करते आणि किंमती खाली जातात. ही घटना भारतीय बाजारपेठांमध्ये आढळते.

iii. रब्बी कांद्याची कमी प्रमाणात साठवण त्याचबरोबर अर्ली-खरीफ आणि खरीफ कांद्याचे सामान्य उत्पादन

रब्बी कांद्याची कमी प्रमाणात साठवणूक तसेच अर्ली-खरीफ आणि खरीफ कांद्याचे सामान्य उत्पादन यामुळे ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान मागणीपेक्षा पुरवठा कमी होतो आणि कांद्याच्या किमती खूप जास्त होऊन जातात. एप्रिल-मे दरम्यान कमी रब्बी उत्पादन, साठवण सुविधांचा अभाव आणि अनुकूल निर्यात वातावरणामुळे शेतकरी कमी प्रमाणात कांदा साठवतो. रब्बी कांद्याचे कमी उत्पादन विशेषतः कमी पाऊस, प्रतिकूल हवामान, कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव, पाण्याची कमतरता या घटकांमुळे होत असते. भारतीय बाजारपेठांमध्ये ही अधिक सामान्य घटना आहे.

कांद्याच्या किंमतीतील चढउताराचा काय परिणाम होतो

किंमतीतील चढउतार उत्पादक आणि ग्राहक दोघांवर पण परिणाम करतात. किंमतीतील चढउतार पीक उत्पादकांच्या उत्पन्नामध्ये अनिश्चितता निर्माण करते आणि ग्राहकाच्या बजेट मध्ये अस्थिरता आणते. बाजारात जास्त आवकेच्या कालावधीत सर्वात कमी किंमत होते व त्यामुळे मुख्यतः अल्पभूधारक आणि लहान शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न कमी करते. कमी आवक च्या काळात कांद्याची जास्त किंमत झाल्यामुळे ग्राहकांची उपभोग शक्ती कमी करते. म्हणून किंमतीतील चढउतार उत्पादक आणि ग्राहक दोघांसाठी आणि शेवटी देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी हानिकारक असतो. रब्बी कांदा हा कांद्याच्या किमतीतील उतार-चढ़ाव त्याचबरोबर किंमती स्थिर करण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे रब्बी कांद्यामुळे किंमतीतील होणारे चढ-उतार आणि स्थिरीकरण याचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. किंमतीतील चढउतारांचे स्वरूप तसेच कारणे आणि उत्पादक व ग्राहक या दोघांवर होणारा परिणाम समजून घेणे अत्यावश्यक आहे. म्हणून रब्बी कांद्यामुळे होणाऱ्या किंमतीतील चढउतारांची कारणे आणि त्यासाठी योग्य उपाय शोधण्याचा प्रयत्न या लेखाद्वारे करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील प्रमुख ए.पी.एम.सी कांदा मार्केट मधील कांद्याची आवक

महाराष्ट्रात पुणे, सोलापूर, मुंबई, कोल्हापूर, नागपूर, पिंपळगाव, लासलगाव, येवला, मनमाड तेसच मालेगाव या मार्केट मध्ये मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक होते. राष्ट्रीय बागवानी अनुसंधान एवं विकास प्रतिष्ठान नुसार सन २०२० मधे एकूण २०९७६११ क्विंटल कांद्याची पुणे मार्केट मधे आवक झाली. तसेच सोलापूर मार्केट मध्ये २४३९७२१ क्विंटल, मुंबई मार्केट मध्ये १३९८६९६ क्विंटल, कोल्हापूर मार्केट मध्ये ८७७२५३ क्विंटल, नागपूर मार्केट मध्ये ३१५७५७ क्विंटल, पिंपळगाव मार्केट मध्ये ३७३२३५० क्विंटल, लासलगाव मार्केट मध्ये ३८३३८३६ क्विंटल, येवला मार्केट मध्ये १८४४९१५ क्विंटल, मनमाड मार्केट मध्ये १०५६२०९ क्विंटल, मालेगाव मार्केट मध्ये ५२५०० क्विंटल कांद्याची आवक झाली.

महाराष्ट्रातील प्रमुख ए.पी.एम.सी कांदा मार्केटमधील बाजार भावाची स्थिति

महाराष्ट्रातील पुणे मार्केट, सोलापूर मार्केट, मुंबई मार्केट, कोल्हापूर मार्केट, नागपूर मार्केट तसेच नाशिक जिल्ह्यातील प्रमुख ए.पी.एम.सी. कांदा मार्केट मधील बाजार भावाची स्थिति चे वर्णन खाली सविस्तर केले आहे. हा अभ्यास पंधरा वर्षात (सन २००० ते २०१५) महाराष्ट्रातील ए.पी.एम.सी. मार्केट मधे आवक झालेल्या कांद्याच्या किंमतींचा डेटा वरून निष्कर्षीत केला गेला आहे व संबंधीत आलेखान मधे प्रस्तुत केला गेला आहे.

पुणे मार्केट मधील बाजार भावाची स्थिति

पुणे मार्केट (आलेख १) मधे सरासरी पेक्षा उणे किंमती फेब्रुवारी ते जुलै या सहा महिन्यांमधे आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट ते जानेवारी या दरम्यान आढळून आल्या. फेब्रुवारी मधे सरासरी पेक्षा -१९ टक्के, मार्च मधे सरासरी पेक्षा -३८ टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्षा -४१ टक्के, मे मधे सरासरी पेक्षा -३९ टक्के, जून मधे सरासरी पेक्षा -१८ टक्के तसेच जुलै मधे सरासरी पेक्षा -६ टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट मधे १० टक्के, सप्टेंबर मधे १८ टक्के, ऑक्टोबर मधे ३८ टक्के, नोव्हेंबर मधे ५३ टक्के, डिसेंबर मधे ३१ टक्के व जानेवारी मधे १२ टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्षा सर्वात जास्त उणे किमती एप्रिल मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्षा सर्वात जास्त अधिक किंमती नोव्हेंबर मधे आढळून आल्या.



आलेख १. पुणे मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

सोलापूर मार्केट मधील बाजार भावाची स्थिति

सोलापूर मार्केट (आलेख २) मधे सरासरी पेक्षा उणे किंमती मार्च ते जून या चार महिन्यांमधे आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती जुलै ते फेब्रुवारी या दरम्यान आढळून आल्या. मार्च मधे सरासरी पेक्षा -२६ टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्षा -४२ टक्के, मे मधे सरासरी पेक्षा -४२ टक्के तसेच जून मधे सरासरी पेक्षा -१७ टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती जुलै मधे २ टक्के, ऑगस्ट मधे ७ टक्के, सप्टेंबर मधे १२ टक्के, ऑक्टोबर मधे १६ टक्के, नोव्हेंबर मधे २८ टक्के, डिसेंबर मधे ३१ टक्के, जानेवारी मधे १५ टक्के व फेब्रुवारी मधे ३ टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्षा सर्वात जास्त उणे किमती एप्रिल-मे मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्षा सर्वात जास्त अधिक किंमती डिसेंबर मधे आढळून आल्या.



आलेख २. सोलापूर मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

मुंबई मार्केट मधील बाजार भावाची स्थिति

मुंबई मार्केट (आलेख ३) मधे सरासरी पेक्षा उणे किंमती फेब्रुवारी ते जुलै या सहा महिन्यांमधे आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट ते जानेवारी या दरम्यान आढळून आल्या. फेब्रुवारी मधे सरासरी पेक्ष्या -१० टक्के, मार्च मधे सरासरी पेक्ष्या -२९ टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्ष्या -३६ टक्के, मे मधे सरासरी पेक्ष्या -३७ टक्के, जून मधे सरासरी पेक्ष्या -२४ टक्के तसेच जुलै मधे सरासरी पेक्ष्या -१२ टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट मधे २ टक्के, सप्टेंबर मधे १५ टक्के, ऑक्टोबर मधे ४१ टक्के, नोव्हेंबर मधे ४३ टक्के, डिसेंबर मधे २९ टक्के व जानेवारी मधे १८ टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त उणे किमती मे मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त अधिक किंमती नोव्हेंबर मधे आढळून आल्या.



आलेख ३. मुंबई मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

कोल्हापूर मार्केट मधील बाजार भावाची स्थिति

कोल्हापूर मार्केट (आलेख ४) मधे सरासरी पेक्षा उणे किंमती फेब्रुवारी ते ऑगस्ट या सात महिन्यांमधे आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती सप्टेंबर ते जानेवारी या दरम्यान आढळून आल्या. फेब्रुवारी मधे सरासरी पेक्ष्या -६ टक्के, मार्च मधे सरासरी पेक्ष्या -२४ टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्ष्या -३१ टक्के, मे मधे सरासरी पेक्ष्या -३७ टक्के, जून मधे सरासरी पेक्ष्या -२० टक्के, जुलै मधे सरासरी पेक्ष्या -९ टक्के तसेच ऑगस्ट मधे सरासरी पेक्ष्या -२ टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती सप्टेंबर मधे १ टक्के, ऑक्टोबर मधे २० टक्के, नोव्हेंबर मधे ३७ टक्के, डिसेंबर मधे ३४ टक्के व जानेवारी मधे ३० टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त उणे किमती मे मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त अधिक किंमती नोव्हेंबर मधे आढळून आल्या.



आलेख ४. कोल्हापूर मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

नागपूर मार्केट मधील बाजार भावाची स्थिति

नागपूर मार्केट (आलेख ५) मधे सरासरी पेक्षा उणे किंमती मार्च ते जुलै या पाच महिन्यांमधे आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट ते फेब्रुवारी या दरम्यान आढळून आल्या. मार्च मधे सरासरी पेक्ष्या -२० टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्ष्या -३६ टक्के, मे मधे सरासरी पेक्ष्या -४१ टक्के, जून मधे सरासरी पेक्ष्या -२६ टक्के तसेच जुलै मधे सरासरी पेक्ष्या -११ टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट मधे १० टक्के, सप्टेंबर मधे १७ टक्के, ऑक्टोबर मधे ३४ टक्के, नोव्हेंबर मधे ३९ टक्के, डिसेंबर मधे १८ टक्के, जानेवारी मधे ११ टक्के व फेब्रुवारी मधे ६ टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त उणे किमती मे मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त अधिक किंमती नोव्हेंबर मधे आढळून आल्या.



आलेख ५. नागपूर मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

नाशिक जिल्ह्यातील ए.पी.एम.सी. मार्केट मधील बाजार भावाची स्थिति

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव, लासलगाव, येवला, मनमाड व मालेगाव या पाचही ए.पी.एम.सी. कांदा मार्केट मधे सरासरी पेक्षा उणे किंमती फेब्रुवारी ते जुलै या सहा महिन्यांमधे आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट ते जानेवारी या दरम्यान आढळून आल्या. या मार्केट मधील किंमतीचे सविस्तर वर्णन खाली केले आहे.

पिंपळगाव मार्केट: पिंपळगाव मार्केट मधे (आलेख ६) फेब्रुवारी मधे सरासरी पेक्ष्या -१४ टक्के, मार्च मधे सरासरी पेक्ष्या -३६ टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्ष्या -४१ टक्के, मे मधे सरासरी पेक्ष्या -४१ टक्के, जून मधे सरासरी पेक्ष्या -१९ टक्के तसेच जुलै मधे सरासरी पेक्ष्या -८ टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट मधे १३ टक्के, सप्टेंबर मधे २२ टक्के, ऑक्टोबर मधे ५३ टक्के, नोव्हेंबर मधे ४१ टक्के, डिसेंबर मधे १८ टक्के व जानेवारी मधे ११ टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त उणे किंमती एप्रिल-मे मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त अधिक किंमती ऑक्टोबर मधे आढळून आल्या.



आलेख ६. पिंपळगाव मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

लासलगाव मार्केट: लासलगाव मार्केट मधे (आलेख ७) फेब्रुवारी मधे सरासरी पेक्ष्या -१३ टक्के, मार्च मधे सरासरी पेक्ष्या -३५ टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्ष्या -४२ टक्के, मे मधे सरासरी पेक्ष्या -४३ टक्के, जून मधे सरासरी पेक्ष्या -१८ टक्के तसेच जुलै मधे सरासरी पेक्ष्या -७ टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट मधे १५ टक्के, सप्टेंबर मधे २२ टक्के, ऑक्टोबर मधे ५१ टक्के, नोव्हेंबर मधे ३९ टक्के, डिसेंबर मधे १९ टक्के व जानेवारी मधे ११ टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त उणे किंमती मे मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त अधिक किंमती ऑक्टोबर मधे आढळून आल्या.



आलेख ७. लासलगाव मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

येवला मार्केट: येवला मार्केट मधे (आलेख ८) फेब्रुवारी मधे सरासरी पेक्ष्या -४ टक्के, मार्च मधे सरासरी पेक्ष्या -३७ टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्ष्या -४५ टक्के, मे मधे सरासरी पेक्ष्या -५० टक्के, जून मधे सरासरी पेक्ष्या -२६ टक्के तसेच जुलै मधे सरासरी पेक्ष्या -८ टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट मधे १२ टक्के, सप्टेंबर मधे १९ टक्के, ऑक्टोबर मधे ४९ टक्के, नोव्हेंबर मधे ४८ टक्के, डिसेंबर मधे २० टक्के व जानेवारी मधे २२ टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त उणे किंमती मे मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त अधिक किंमती ऑक्टोबर मधे आढळून आल्या.



आलेख ८. येवला मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

मनमाड मार्केट: मनमाड मार्केट मधे (आलेख ९) फेब्रुवारी मधे सरासरी पेक्ष्या -१२ टक्के, मार्च मधे सरासरी पेक्ष्या -३७ टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्ष्या -४१ टक्के, मे मधे सरासरी पेक्ष्या -४५ टक्के, जून मधे सरासरी पेक्ष्या -१६ टक्के तसेच जुलै मधे सरासरी पेक्ष्या -४ टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट मधे १८ टक्के, सप्टेंबर मधे २२ टक्के, ऑक्टोबर मधे ५४ टक्के, नोव्हेंबर मधे ३२ टक्के, डिसेंबर मधे १८ टक्के व जानेवारी मधे ११ टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त उणे किंमती मे मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त अधिक किंमती ऑक्टोबर मधे आढळून आल्या.



आलेख ९. मनमाड मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

मालेगाव मार्केट: मालेगाव मार्केट मधे (आलेख १०) फेब्रुवारी मधे सरासरी पेक्ष्या -८ टक्के, मार्च मधे सरासरी पेक्ष्या -२८ टक्के, एप्रिल मधे सरासरी पेक्ष्या -४३ टक्के, मे मधे सरासरी पेक्ष्या -४६ टक्के, जून मधे सरासरी पेक्ष्या -२३ टक्के तसेच जुलै मधे सरासरी पेक्ष्या -१० टक्के किंमती आढळून आल्या. त्याचबरोबर सरासरी पेक्षा अधिक किंमती ऑगस्ट मधे १२ टक्के, सप्टेंबर मधे २२ टक्के, ऑक्टोबर मधे ४५ टक्के, नोव्हेंबर मधे ३१ टक्के, डिसेंबर मधे २७ टक्के व जानेवारी मधे २० टक्के याप्रमाणे आढळून आल्या. सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त उणे किंमती मे मधे आढळून आल्या. तसेच सरासरी पेक्ष्या सर्वात जास्त अधिक किंमती ऑक्टोबर मधे आढळून आल्या.



आलेख १०. मालेगाव मार्केट मधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती

फेब्रुवारी - मार्च दरम्यान किमती का कमी असतात? थोडक्यात

महाराष्ट्रातील बहूंताश कांदा मार्केट मधे फेब्रुवारी ते जुलै दरम्यान कांद्याच्या किमती कमी होऊन जातात. आपण वरती चर्चा केल्याप्रमाणे रब्बी कांद्याची जास्त आवक झाल्यामुळे कांद्याच्या किमती एप्रिल ते जुलै मध्ये कमी होतात. त्याचप्रमाणे फेब्रुवारी-मार्च दरम्यान लेट-खरीफ कांदयाची मोठ्या प्रमाणात आवक होते व त्यामुळे सरासरी पेक्षा उणे किंमती या काळात राहतात. देश्याच्या एकूण कांदा उत्पादना पैकी ३०-४० टके उत्पादन लेट-खरीफ हंगामामधून मिळते. इतक्या मोठ्या प्रमाणात लेट-खरीफ कांदयाचे उत्पादन व कमी साठवण क्षमता यामुळे हा कांदा मोठ्या प्रमाणात फेब्रुवारी-मार्च मधे मार्केट मधे येतो. म्हणून फेब्रुवारी - मार्च दरम्यान कांद्याच्या किमती कमी असतात.

परंतु रब्बी कांदयाची साठवण क्षमता चांगली असून सुधा हा कांदा मोठ्या प्रमाणात एप्रिल-मे दरम्यान मार्केट मधे आणला जातो व त्यामुळे एप्रिल-मे मधे मोठ्या प्रमाणात कांदयाच्या किंमती कमी होतात. रब्बी उत्पादकांनी वाजवी दर मिळण्यासाठी खालील प्रमाणे काळजी घेतली पाहिजे.

रब्बी कांदा उत्पादकांनी वाजवी दर मिळण्यासाठी घ्यावयाची काळजी

शेतकर्यांनी रब्बी कांद्याचे उत्पादन दोन उद्देशाने घेतले पाहिजेत. एक म्हणजे त्याची साठवण क्षमता अधिक काळ असली पाहिजेत व दूसरे म्हणजे त्यामधे निर्यात गुणवत्ता स्पर्धात्मक असावी.

१. शेतकर्यांनी विशेसता अल्प व अत्यल्प भूधारक शेतकर्यांनी एप्रिल ते जून दरम्यान कमी प्रमाणात रब्बी कांदा बाजारात आणला पाहिजे. उर्वरित साठ्विलेला कांदा ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान समप्रमाणात बाजारात आणला गेला पाहिजे.

२. कांदा काढणीनंतर सर्वाधिक नुकसान साठवणी दरम्यान होते. साठवणी दरम्यान होणारे नुकसान दोन प्रकारे कमी केले जाऊ शकते. एक म्हणजे कापणीपश्चात तंत्रज्ञानामधे सुधारणा करून व दूसरे म्हणजे शेतामधे कांदा पिकाची काळजीपूर्वक जोपासना करून. कांदयाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी शेतकर्यांनी खालील प्रमाणे काळजी घेतली पाहिजेत

- रब्बी हंगामासाठी साठवणूक क्षमता चांगली असलेली जात निवडावी
- रासायनिक खतांचा वापर संतुलित प्रमाणात करावा. भरखते देताना नत्रखतांचा अतिप्रमाणात वापर करू नये. लागवडीनंतर ६० दिवसांच्या नंतर कांदा पोसण्याच्या कालावधीत नत्र खतांचा वापर टाळावा. वाढलेला दर सापडावा, कांदा लवकर पोसावा म्हणून रासायनिक खतांचा जादा वापर करू नये, त्यामुळे साठवणूकीमधे कांदा लवकर सडतो. तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार खतमात्रा आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी.
- अन्नद्रव्यांची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी जैविक खतांचा अधिक वापर करावा. शेण खत, गांडुळ खत, निंबोळी खत, हिरवळीची खते इत्यादि चा वापर आधिक प्रमाणात करावा.
- असंतुलित प्रमाणात पाण्याचा वापर कांदयाची साठवणूक क्षमता कमी करते. पाण्याचे प्रमाण आणि दोन पाळींतील अंतर हे त्या ठिकाणाचे हवामान, पिकाची वाढीची अवस्था, लागवडीचा हंगाम, जमिनीचा मगदूर इत्यादी वर अवलंबून असते. जमीनीचा प्रकार आणि स्थानिक हवामान च्या आधारे पाण्याचे प्रमाण आणि दोन पाळींतील अंतर शेतकर्यांनी निश्चित करावे. अतिशय जास्त किंवा अतिशय कमी प्रमाणात पाणी देऊ नये. पिकाला पाणी देताना १८ सें.मी. पेक्षा जास्त खोलवर ओल जाईल असे पाणी देण्याची गरज नाही, कारण कांद्याची मुळे वरच्या १८ सें.मी. मधेच पसरलेली असतात. कांदा काढणीपूर्वी १०-१५ दिवस पाणी बंद केल्यास साठवणूकी मधे मायक्रोबियल क्रियाकलापांमुळे होणारे नुकसान कमी होते.

कांद्याची वाढ पूर्ण होऊन पाने पिवळी पडून माना पडू लागल्याबरोबर पाणी तोडल्यास कांदा पोसतो, सड कमी होते व माना जाड होत नाहीत. तसेच वरचा पापुद्रा सुकून कांद्याला काढणीच्या वेळेस इजा होत नाही.

- याशिवाय, काढणीची वेळ कांदयाची साठवण क्षमता ठरण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पिकाची काढणी ५० टक्के माना मोडल्यानंतर करावी. कांद्याची पात पिवळी पडून कांदा मानेत वाकतो व पात आडवी पडते, यालाच मान मोडणे असे म्हणतात. या काळात पानांतील अन्नरस कांद्यामध्ये उतरून कांदा घट्ट होतो. कांदा पातीतील अन्नरस पात्यामधून कांद्यामध्ये उतरतो व तदनंतर कांदा सुप्त अवस्थेत जाऊन साठवणूक करण्यासाठी पक्व होतो.
- कांदा काढल्यानंतर तो शेतामध्ये पातीसह तीन दिवस सुकण्यास पडू द्यावा. ढीग न करता पहिला कांदा दुस-या ओळीच्या कांद्याच्या पातीने झाकून जाईल अशा पद्धतीने जमिनीवर एकसारखा पसरवून ठेवावा. त्यानंतर कांद्याची पूर्ण सुकलेली पात २ ते ३ सें.मी. लांब मान ठेवून कापावी.
- त्यानंतर कांदा छपराच्या अथवा झाडाच्या सावलीत दोन-तीन आठवडे पातळ थरात वाळवावा. या काळात कांद्यातील उष्णता निवळून बाहेरून पत्ती सुटते, आकर्षक रंग येतो. तसेच वाळलेली मुळे व चिकटलेली माती गळून पडते व त्यामुळे साठवणीच्या काळात मायक्रोबियल संसर्ग होण्याची शक्यता कमी राहते.
- नंतर कांद्याची प्रतवारी करून सडलेले, मोड आलेले, जोडकांदे, चिंगळी कांदे काढून टाकावेत. अशा तऱ्हेने योग्य सुकविलेल्या कांद्याची प्रतवारी करून फक्त मध्यम आकाराचे एकसारखे कांद्याची साठवणूक करावी.
- ३० सें.मी. पेक्षा जास्त उंचीवरुन कांदा खाली पडल्यास त्याला दुखापत होते व त्यामुळे साठवणी दरम्यान मायक्रोबियल संक्रमणाचा धोका वाढतो. तसेच थेट उन्हामधे कांदा वाळविल्यास सनबर्निंग होऊ शकते.

३. साठवणीमध्ये वजनात घट, कांद्याची सड व कांद्यास कोंब येणे या तीन प्रकारे नुकसान होते. मे ते जुलै मधील जास्त तापमाणामुळे श्वसनामार्फत पाण्याचे उत्सर्जन होउन वजनात २५-३० टक्के पर्यंत घट येऊ शकते. त्यासाठी कांदयाची चाळ झाडाच्या खाली सावलीमधे असावी. जुलै ते सप्टेंबर दरम्यान वातावरणातील अधिक आद्रतेमुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊन १० ते १५ टक्के पर्यंत नुकसान होऊ शकते. त्यासाठी काढणी-पश्चात वरती सांगितल्या प्रमाणे कांदयाची काळजी घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर संशोधन संस्थांनी शिफारस केलेल्या चाळीतच कांदा साठवावा. अशा प्रकारे विविध बाबींचे कांदा लागवडी पासून योग्य व्यवस्थापण केल्यास साठवणीतील नुकसानीचे प्रमाण कमी केले जाऊ शकते. योग्य काळजी घेऊन कांदा साठविल्यास रब्बी कांदा ६ ते ८ महिने उत्तम टिकतो.

४. साठवलेला कांदा ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान समान प्रमाणात बाजारात आणला गेल्यास रब्बी शेतकर्यांना वाजवी बाजार भाव मिळू शकतो व त्याचबरोबर बाजारामधील किमंतीची होत असलेली अस्थिरता कमी होऊ शकते.

५. शेतकर्यांनी आलेख १-१० मधे दर्शविलेल्या सरासरी पेक्षा कमी/जास्त कीमतींचा आढावा घेऊन कांदा बाजरामधे आणण्याचा प्रयत्न करावा.

हर कदम, हर डगर
किसानों का हमसफर
भारतीय कृषि अनुसंधान परिषद

Agrisearch with a human touch

आज़ादी का अमृत महोत्सव

राअस्ट्रैप्रसं
NIASM

भाकृअनुप – राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

ICAR–National Institute of Abiotic Stress Management

बारामती, पुणे, महाराष्ट्र 413 115

Baramati, Pune, Maharashtra 413 115